# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२५**

**सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**मंगळवार, दिनांक १८ मार्च, २०२५**

## सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ४**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: एन-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२०२, सर्वसाधारण शिक्षण**<br>**रूपये:- ६,७१,९२,७६,०००/-**<br>**श्रीमती ज्योती गायकवाड** |
| (१) | २५६ | १०० | धारावीमध्ये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर शासकिय औदयोगिक संस्थेस (आय.टी.आय.) सन २०१४ व सन २०१६ मध्ये पदांसाठी मंजूरी मिळालेली असणे, सदर भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर शासकिय औदयोगिक संस्था (आय.टी.आय.) जागेअभावी सध्या भायखळा येथे सुरु असणे, याकरिता तत्कालिन सरकारने रु.८२ लक्ष मंजूर केलेले असणे, सदर डॉ.बाबासाहेब आंबेडकर शासकिय औदयोगिक संस्था (आय.टी.आय.) जागेअभावी सुरु असल्याने विद्यार्थ्यांना त्रास होत असल्याने मंजूर झालेल्या जागेमध्ये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर शासकीय औदयोगिक संस्था (आय.टी.आय.) सुरु करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: एन-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२२५, अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्याक यांचे कल्याण**<br>**रूपये:- ६२,१०,२९,९९,०००/-**<br>**श्री. विजय वडेट्टीवार** |
| (२) | ३६३ | १० | सामाजिक न्याय विभागाअंतर्गत मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी सद्यस्थितीत सुरु असलेल्या एकूण ४४३ शासकीय वसतिगृहे तसेच अनुसूचित जाती व नवबौध्द मुला-मुलींच्या शिक्षणासाठी सुरु असलेल्या एकूण ९३ शासकीय निवासी शाळांमध्ये विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाचे भोजन व दूध पुरवठा करण्यासाठी आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, पुणे यांच्या स्तरावर सन २०२४ मध्ये ई-निविदा प्रक्रिया राबवण्यात आलेली असणे, त्याअनुषंगाने आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, पुणे यांच्या स्तरावरील खरेदी समितीने शिफारस केलेल्या क्रिस्टल गारमेंट प्रायव्हेट लिमिटेड, ब्रिस्क इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, बीव्हीजी इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, इ-गव्हर्नन्स सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड या कंपन्यांना पुरवठादार म्हणून शासनाने दिनांक ६ नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार मान्यता दिलेली असणे, सदरील पुरवठादारांना मान्यता देताना भोजन पुरवठा दरात तब्बल २५% वाढ केल्याचे उघडकीस आलेले असणे, संबंधित |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | पुरवठादारांनी त्यांच्या स्तरावर सबकॉन्ट्रॅक्टींग करून क्षमता नसलेल्या तसेच गैरप्रकार केलेल्या संस्थाना काम दिलेले असणे, एकंदरीतच सदरील निविदा प्रक्रियेत शासनाने तीन वर्षासाठी जवळपास रु.२४० कोटी हून अधिकची रक्कम अतिरिक्त दिली असल्याचे तसेच ठराविक निविदाकार सदरील निविदेसाठी पात्र होणेसाठी अटी शर्ती बदलल्या असल्याचे देखील उघडकीस आलेले असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना |
| | | | **मागणी क्रमांक: एन-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण**<br>**रूपये:- ८९,२५,४८,७९,०००/-**<br>**श्री. अनंत (बाळा) नर** |
| (३) | ५८२ | १०० | जोगेश्वरी पूर्व विधानसभा मतदार संघामधील आरे कॉलनीमधील मौजे कोंडीविटा येथे आधारकेंद्र प्रस्तावित असणे, सदर ठिकाणी आधार केंद्र बनविण्याबाबत मागणी होत असल्याने याठिकाणी आधारकेंद्र बनविण्याकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (४) | ४४० | १० | राज्यातील ज्येष्ठ व वृद्ध नागरिकांना विविध सवलती देण्यात येत असणे, मात्र रेल्वेच्या स्लीपर क्लास, वातानुकूलित वर्ग-२ व वातानुकूलित वर्ग-३ या वर्गामधून प्रवास करणाऱ्या ज्येष्ठ व वृद्ध नागरिकांनी रेल्वे तिकीट दरातील सवलत रेल्वे प्रशासनाने कोविड-१९ पासून बंद केली असणे, टिकीट दरातील सवलत पुन्हा सुरू करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे. ज्येष्ठ व वृद्ध नाकरिकांना तिकीटात ४० टक्के सवलत देण्यासंदर्भात महाराष्ट्र शासनाने केंद्र शासन व रेल्वे प्रशासनाकडे पाठपुरावा करण्याची नितांत आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

---

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १७ मार्च, २०२५**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई